प्रेसनोट　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक ०९/०४/२०२५

**ठाणे – नागरी सुविधा केंद्र, 'आय' प्रभाग समिती, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, खडेगोळवली, ता. कल्याण, जि. ठाणे येथील लिपिक यांना सापळा कारवाई दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी ताब्यात घेतले बाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :– | ठाणे |
| स्टेशन डायरी नोद क्रमांक | :– | कोळशेवाडी पोलीस ठाणे ठाणे शहर येथे स्टेशन डायरी क्र. ०२५/२०२५, वेळ १५:४८, दि. ०९/०४/२०२५ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | संतोष गजानन पाटणे, वय ५२ वर्षे, पद– लिपिक, नागरी सुविधा केंद्र, 'आय' प्रभाग समिती, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, खडेगोळवली, ता. कल्याण, जि. ठाणे |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | १५००/– रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :– | १५००/– रुपये |
| थोडक्यात हकीकत | :– | यातील तक्रारदार यांनी, त्यांचे मानलेल्या भावाचे विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जातील साक्षीदार हे स्थानिक व नात्यातील नसल्यामुळे साक्षीदार न बदलता विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र लवकरात लवकर देण्यासाठी यातील लोकसेवक संतोष गजानन पाटणे, वय ५२ वर्षे, पद– लिपिक, नागरी सुविधा केंद्र, 'आय' प्रभाग समिती, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, खडेगोळवली, विठ्ठलवाडी, ता. कल्याण, जि. ठाणे हे तक्रारदार यांचेकडे २०००/– रु. लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याने यातील तक्रारदार यांनी लोकसेवक संतोष गजानन पाटणे, यांचे विरूध्द कारवाई करण्याकरिता अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दि. ०८/०४/२०२५ रोजी लेखी तक्रार दिलेली आहे.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०९/०४/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये यातील लोकसेवक संतोष गजानन पाटणे, यांनी तक्रारदार यांना त्यांचे मानलेल्या भावाचे विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र हे अर्जातील साक्षीदार न बदलता लवकरात लवकर देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १५००/– रुपये लाचेची मागणी केली. त्याअनुषंगाने दि. ०९/०४/२०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये यातील लोकसेवक संतोष गजानन पाटणे यांना तक्रारदार यांचेकडून १५००/– रु लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आलेले असून पुढील तपास सुरु आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि,भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ– acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अ‍ॅप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर– १०६४
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अ‍ॅप् क्रमांक – ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते
ठाणे

(सचिन मोरे)
पोलीस निरीक्षक,
अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे